दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १३६ • RNI : MAHMAR/2023/87818 • बुधवार दि.१९ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# औरंगजेब तुमचा नातेवाईक होता का? : उपमुख्यमंत्री शिंदे संतापले

## देवेंद्र फडणवीस यांच्यावरील टीकेनंतर सभागृहात विरोधकांना सुनावले

**मुंबई (वृत्तसंस्था)–औरंगजेबाचे उदात्तीकरण करायला तो काय तुमचा नातेवाईक होता का? असा प्रश्न उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विचारला आहे. औरंगजेबाचे उदात्तीकरण आणि समर्थन सहन केले जाणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तुलना औरंगजेबासोबत केली होती. त्यामुळे सपकाळ देखील देशद्रोही असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. सपकाळ यांनी महाराष्ट्राची माफी मागावी, असा कडक इशारा शिंदे यांनी दिला आहे. औरंगजेब महाराष्ट्राला लागलेला कलंक असल्याचे देखील ते म्हणाले.**



हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांची तुलना क्रुर प्रशासक म्हणून औरंगजेबाशी केली. औरंगजेब हा देशद्रोही होता. त्याने धर्मवीर संभाजी महाराज यांचा छळ केला, त्यांचे डोळे काढले, जीभ छाटली. मुख्यमंत्र्यांनी सपकाळ यांची जीभ छाटली का? डोळे काढले का? चांबडी सोलली का? असे प्रश्न शिंदे यांनी उपस्थित केले. तुम्ही कोणाची तुलना कोणाशी करत आहात? असा प्रश्न त्यांनी काँग्रेसला विचारला. छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना तुम्ही औरंगजेबाशी करता का? तुमचे काय चालले? असेही शिंदे यांनी नाना पटोले यांना विचारले आहे. तुमचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माफी मागायला हवी. अन्यथा ते औरंगजेबाचे समर्थन करत असल्याने तेही देशद्रोही ठरत असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.

गेल्या काही दिवसापासून या राज्यामध्ये औरंगजेबाचे उदात्तीकरण का सुरू आहे? कोणी सुरू केले? कशासाठी सुरू केले? त्याच्या मुळाशी सरकार जाणारच असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. मात्र, औरंगजेब हा चांगला प्रशासक होता, शिवाजी महाराजांसारखा होता, अशी तुलना अबू आझमी यांनी केली होती. त्याच वेळी आझमी यांना समज दिली होती. मात्र, औरंगजेबाचे उदात्तीकरण योग्य आहे का? हा माझा प्रश्न असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

# राजुरा विधानसभा क्षेत्र प्रदूषणाच्या विळख्यात आ.भोंगळे यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित केला

## पर्यावरणमंत्र्यांचे तातडीने उपाययोजनांचे आश्वासन

**राजुरा । प्रतिनिधी**

राजुरा व कोरपना तालुक्यातील वेकोलीच्या कोळसा खाणी, सिमेंट कंपन्या आणि कोल वॉशरीजमुळे मोठ्या प्रमाणात हवा, पाणी, मृदा आणि ध्वनी प्रदूषण वाढले आहे. याचा स्थानीय नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून शेतीचेही मोठे नुकसान होत आहे.

आमदार देवराव भोंगळे यांनी विधानसभेत हा प्रश्न मांडत तातडीने उपाययोजनांची मागणी केली. या चर्चेनंतर पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी पंधरा दिवसांत चंद्रपूर जिल्ह्यात येऊन परिस्थितीचा आढावा घेण्याचे आश्वासन दिले. तसेच, प्रदूषण समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी तज्ज्ञ समिती गठीत केली जाणार आहे.पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी तातडीने कारवाईचे आश्वासन दिले असून, आगामी काळात राजुरा व कोरपना तालुक्यातील नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.



### आ.भोंगळे यांची मागणी

- प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांनी नुकसान भरपाई द्यावी
- नागरिकांसाठी आरोग्य शिबिरे आणि
- मोफत उपचार सुविधा उपलब्ध करावी
- प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात

### प्रमुख समस्या

- ब्लास्टिंगमुळे घरांना तडे;मोठ्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण
- हवेत धुळीचे प्रमाण वाढल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या
- भूगर्भातील पाणी पातळी घटली; पाण्यात क्लोराईड वाढल्याने आजार
- शेतीवर धुळीचा थर बसल्याने उत्पादन घटले
- वर्धा नदीच्या पाण्यात वेकोलीचे प्रदूषित पाणी मिसळत असल्याने नदी दूषित

# भाजपला महाराष्ट्राचा मणिपूर करायचाय–आदित्य ठाकरे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी नागपूर येथील हिंसाचाराच्या मुद्यावरून सत्ताधारी भाजपवर टीकेची झोड उठवली आहे. भाजपची महाराष्ट्राचा मणिपूर करण्याची इच्छा आहे. त्यांना ज्या ठिकाणी सत्ता राबवता येत नाही, त्या ठिकाणी ते दंगली घडवतात, असे ते म्हणालेत.

खुलताबाद स्थित औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मुद्यावरून सोमवारी रात्री नागपूर येथे हिंसाचार झाला. त्यात पोलिसांसह अनेकजण जखमी झाले. या प्रकरणाचे विधिमंडळातही तीव्र पडसाद उमटलेत. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी भाजपवर टीका केली आहे. ते विधिमंडळ परिसरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, नागपुरात हिंसाचाराची घटना घडली. पण मुख्यमंत्री कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद किंवा माहिती देण्यात आली नाही. जेव्हा अफवा पसरल्या तेव्हाही मुख्यमंत्री कार्यालयाने आपली



प्रतिक्रिया दिली नाही. असे का झाले? असा प्रश्न मला पडला आहे.मुख्यमंत्री कार्यालयाचे काम मी अगदी जवळून पाहिले आहे. राज्यात एखाद्या ठिकाणी अशी घटना घडते, तेव्हा तत्काळ मुख्यमंत्री कार्यालयाला त्याची माहिती मिळते. गृह विभागालाही माहिती व रिपोर्ट मिळतो. त्यामुळे या विभागांना असे काही होणार आहे याची कल्पना आली नाही का? नागपूर हे तर स्वतः मुख्यमंत्री महोदयांचे शहर आहे. देवेंद्र फडणवीस स्वतः मुख्यमंत्री व गृहमंत्री आहेत.

# विधान परिषद पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची चिन्हे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–विधान परिषदेसाठी रिक्त पाच जागांसाठी पोटनिवडणूक होत आहे. २७ मार्च रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत सोमवारपर्यंत होती. निवडणुकीसाठी ६ जणांचे अर्ज आले होते. मंगळवारी अर्जांची छाननी करण्यात आली. यामध्ये एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. त्यामुळे विधान परिषदेची पोटनिवडणूक बिनविरोध होणार असल्याची चिन्हे आहेत.

विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांनी तर शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके यांनी अर्ज दाखल केला होता. यासोबतच एका अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल केला होता. मात्र, अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद ठरवण्यात आला आहे. अपक्ष उमेदवाराकडे आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणि नोटरी नसल्याने अर्ज बाद झाला. अर्ज मागे घेण्याची तारीख २० मार्च आहे. अशात निवडणूक अधिकारी २० तारखेनंतर बिनविरोध संदर्भात अधिकृत घोषणा करणार आहेत.

# नागपूर दंगल एका मोठ्या कटाचा भाग:राज्यातील एका विषारी मंत्र्याकडून दररोज समाजात द्वेष पसरवण्याचे काम –प्रकाश आंबेडकर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–बजरंग दल व विहिंपच्या आंदोलनानंतर नागपुरात झालेल्या दंगलीमुळे अवघ्या राज्याचे राजकारण तापले आहे. वंचित बहजुन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी या घटनेवरून राज्य सरकारलाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. त्यांनी राज्यातील एका विषारी मंत्र्याकडून दररोज समाजात द्वेष पसरवण्याचे काम सुरू असल्याचा आरोप करत नागपूरची दंगल एका मोठ्या कटाचा भाग असल्याचा दावा केला आहे.गत काही दिवसांपासून महाराष्ट्रात औरंगजेबाच्या कबरीवरून मोठे रणकंदन माजले आहे. मंत्री नीतेश राणे यांनी छत्रपती संभाजीनगरच्या खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर हटवण्याचे भाष्य केल्यानंतर हिंदुत्त्वादी संघटनांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी सोमवारी या प्रकरणी राज्यात अनेक ठिकाणी आंदोलन केले. त्यानंतर नागपुरात रात्रीच्या वेळी मोठी दंगल उसळली. त्यात ३३ पोलिसांसह अनेकजण जखमी झालेत.वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी या घटनाक्रमावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. तसेच या घटनेसाठी एकप्रकारे राज्य सरकारच



जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. महाराष्ट्र सरकारमधील एक विषारी मंत्री दररोज खुलेआमपणे साजात द्वेष पसरवण्याचा व दुही पिकवण्याचे काम करत आहे. एवढेच नाही तर महाराष्ट्रात दोन समाजात द्वेष पसरवण्यासाठी बाहेरून लोक आणले जात आहेत. हा एका मोठ्या सूनियोजित कटाचा भाग आहे, असे आंबेडकर मंत्री नीतेश राणे यांचे नाव न घेता म्हणाले. यावेळी त्यांनी नागपूरसह राज्यातील सर्वच जनतेला अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचेही आवाहन केले.

# कामगार मृत्यू प्रकरणी ‘ओमॅट’ कंपनीविरोधात ३ फौजदारी खटले

## आमदार सुधाकर अडबाले यांच्या पाठपुराव्याला यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ताडाळी येथील औद्योगिक वसाहतीतील ओमॅट वेस्ट लिमिटेड कंपनीत कामगारांच्या मृत्यूची घटना घडली असून, त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याची व कंपनीवर कारवाई करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी विधीमंडळात तारांकित प्रश्नाद्वारे केली होती. दोन्ही अपघातांबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशीदरम्यान आढळून आलेल्या भंगाबाबत मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय चंद्रपूर यांच्या न्यायालयात कारखान्याचे भोगवटादार यांचे विरूध्द एकूण ३ फौजदारी खटले दाखल करण्यात आल्याचे कामगार मंत्र्यांनी सांगितले.

दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता अजय रवींद्र राम (रा. बिहार) या कामगाराचा २० फुट उंचीवरून २०० किलो स्टील स्क्रॅप अंगावर पडून मृत्यू झाला. मात्र, कंपनी व्यवस्थापनाने कोणताही मोबदला न देता परस्पर मृतदेह बिहारला पाठवला. यापूर्वी, दिनांक २३ जून २०२४ रोजी श्यामसुंदर ठेंगणे या कामगाराचाही अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबियांना उर्वरित १५ लाखांची नुकसानभरपाई अद्याप देण्यात आलेली नाही. कंपनीत याआधीही अनेक कामगारांचा सुरक्षाव्यवस्थेअभावी मृत्यू झाला असल्याचे समोर आले आहे. हे दोन्ही प्रकरण आमदार सुधाकर अडबाले यांनी उचलून धरले होते.या कंपनीत कामगारांसाठी आवश्यक सुरक्षात्मक साधनसामग्री पुरवली जात नाही, तसेच सुरक्षा अधिकारीही नेमलेला नाही, असेही आरोप करण्यात आले. याबाबत अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याने कंपनी व्यवस्थापनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून सखोल चौकशी करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे केली.आमदार सुधाकर अडबाले यांच्या प्रश्नावर कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी उत्तर देताना सांगितले की, अजय रवींद्र राम हे राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांच्या कुटुंबाला २ लाख सानुग्रह अनुदान व इतर लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.श्यामसुंदर ठेंगणे यांच्या कुटुंबास ३० लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली आहे. तसेच त्यांच्या पत्नीला २०१.८६ रुपये प्रति दिवस, मुलगा व मुलीला प्रत्येकी १३४.५७ रुपये प्रति दिवस लाभ राज्य कामगार कार्यालयाकडून मंजूर झालेला आहे. यापूर्वी १६ जून २०२२ रोजी निकलेश हरीराम इनवटे या कामगाराचा मृत्यू झाला होता, तर १६ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या अपघातात सिकंदर यादव गंभीर जखमी झाले होते. या कामगाराचा उपचारादरम्यान ३ फेब्रुवारी २०२५ रोजी मृत्यू झाला.कामगारांच्या अपघातांसंदर्भात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाने चौकशी केली असून, मुख्य न्यायदंडाधिकारी, चंद्रपूर न्यायालयात कारखान्याच्या भोगवटादारांविरोधात ३ फौजदारी खटले दाखल करण्यात आल्याची माहिती कामगार मंत्र्यांनी उत्तरात दिली.



# शिक्षक आणि विद्यार्थी अस्वस्थ: परिक्षेपूर्वीच्या घाईघाईच्या उपक्रमांबाबत पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची मागणी

**मुल । प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील मार्च आणि एप्रिल महिन्यातील विविध उपक्रमांमुळे शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर तणावाखाली असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे याबाबत योग्य निर्णय घेण्याची मागणी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. संघटनेने राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवले आहे.मार्च महिना हा वर्षभर शिकवलेल्या पाठ्यक्रमाच्या उजळणीसाठी महत्त्वाचा असतो, तर एप्रिलमध्ये परीक्षा, पेपर तपासणी आणि मूल्यमापनाचे काम पार पडते. मात्र, सध्या शिक्षकांना या काळात इतर उपक्रमांमध्ये व्यस्त ठेवले जात असल्यामुळे मूल्यमापनाच्या महत्त्वाच्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष होत आहे.

राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये SCQAAF (स्काफ) प्रणाली लागू करण्यात आली असून, त्याअंतर्गत १२८ मानकांची पूर्तता करावी लागत आहे. मात्र, अनेक शाळांमध्ये संगणक, इंटरनेट सुविधा आणि निधीचा अभाव असल्याने गुगल ड्राईव्हवर पुरावे अपलोड करणे अवघड बनले आहे. याशिवाय, अनेक शिक्षकांना ऑनलाईन कामाचा पुरेसा सराव नाही, तसेच महिला शिक्षक, दोन शिक्षक असलेल्या शाळा आणि विजेच्या वाढत्या खर्चामुळे तांत्रिक मर्यादा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे SCQAAF प्रणालीमध्ये ऑनलाईन प्रक्रियेस सक्ती करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. सत्र २०२४-२५ मधील वार्षिक परीक्षा एप्रिलच्या अखेरीस घेतल्या जाणार आहेत. परंतु, उष्णतेच्या लाटेमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी येणे कठीण होऊ शकते. याशिवाय, सर्वंकष मूल्यमापन, प्रकल्प, निकाल प्रक्रिया आणि उन्हाळी अभ्यास यासाठी वेळ अपुरा पडत आहे. त्यामुळे वार्षिक परीक्षा १५ एप्रिलपासून सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्षभर झालेल्या व्यस्ततेनंतर उन्हाळी सुट्टी ही विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची असते. सुट्टीच्या काळात मोबाईल वापरासंदर्भात आधीच पालक चिंतेत असताना विद्यार्थ्यांना ऑनलाईन अभ्यास सक्तीने देणे योग्य नाही. त्यामुळे हा उपक्रम २६ जूननंतर राबवावा, म्हणजे शाळेच्या पूर्वतयारीस मदत होईल, अशी सूचना करण्यात आली आहे. मार्च-एप्रिल महिन्यात शिक्षकांना पाठवली जाणारी विविध माहिती, सभा आणि प्रशिक्षणासाठी शाळेबाहेर पाठवले जात आहे. त्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांकडे पूर्ण लक्ष देऊ शकत नाहीत. या काळात कोणतेही प्रशिक्षण किंवा सभा आयोजित करू नयेत, अशी विनंती संघटनेने केली आहे. या सर्व मागण्यांचा गांभीर्याने विचार करून राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या हितासाठी योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील आणि राज्य सरचिटणीस हरीश ससनकर यांच्या स्वाक्षरीने करण्यात आली आहे. या निवेदनाबाबतची माहिती चंद्रपूर जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार यांनी दिली.

## पोटेगावचे माजी सरपंच केरबा शिरगिरे यांचे निधन

**पोटेगाव । प्रतिनिधी**



ग्रामपंचायतीचे माजी सरपंच केरबा शिरगिरे (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने राहत्या घरी निधन झाले. धार्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे गावकरी त्यांना आदराने 'आबा' या नावाने संबोधत. त्यांची सरपंचपदी बिनविरोध निवड होत असे, यामुळे त्यांनी दीर्घकाळ गावाच्या विकासासाठी योगदान दिले. त्यांच्या अंत्यविधीसाठी तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. पोटेगावचे पोलीस पाटील अंकुश शिरगिरे यांचे ते वडील होते.

## आश्लेषा बागडे यशवंतश्री पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर । प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आश्लेषा बागडे हिला राष्ट्रीय स्तरावरील कुस्ती स्पर्धेतील उल्लेखनीय यशासाठी महाविद्यालयाचा पहिला 'यशवंतश्री' पुरस्कार प्रदान करण्यात आला.विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे सर यांच्या संकल्पनेतून यावर्षीपासून महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा 'यशवंतश्री' पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र आणि ५१ हजार रुपये असे आहे. हा सोहळा यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त



विजयश्री सभागृहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे सर होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजेंद्र दास यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.अध्यक्षीय भाषणात विलासराव घुमरे सर यांनी आश्लेषा बागडेच्या उत्तुंग कामगिरीचे कौतुक करत महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचा भक्कम पाठिंबा राहील, असे आश्वासन दिले.कार्यक्रमाला विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, उपाध्यक्ष तात्यासाहेब मस्कर, विश्वस्त चंद्रशेखर शीलवंत, माजी शिक्षण विस्तार अधिकारी अनिल बदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, आश्लेषा बागडे यांचे कुटुंबीय तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मिलिंद फंड यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. विष्णु शिंदे यांनी केले, तर आभार प्रा. एम.डी. जाधव यांनी मानले.

## मोरवडच्या महात्मा जोतीराव फुले विद्यालयाचा रौप्य महोत्सव सोहळा

### ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व क्रीडामंत्री दत्तामामा भरणे उपस्थित राहणार

**सोलापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील पश्चिम भागातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था - सदाशिव मोहोळकर शिक्षण संस्था जंक्शन संचलित महात्मा जोतीराव फुले विद्यालय, मोरवड ता. करमाळा, याच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याने विद्यालयाचा रौप्य महोत्सव सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रम रविवार, २३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडामंत्री दत्तामामा भरणे उपस्थित राहणार आहेत. याशिवाय करमाळा तालुक्याचे आमदार नारायण आबा पाटील, माजी आमदार संजय मामा शिंदे, जयवंतराव जगताप, शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, नेचर डिलाईटचे चेअरमन अर्जुन देसाई, संस्थेचे अध्यक्ष वसंत मोहोळकर, विद्याविकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, प्रा. गणेश करे-पाटील, दिग्विजय बागल, महेश चिवटे, गणेश चिवटे, प्रा. रामदास झोळ, रमेश कांबळे, मच्छिंद्रनाथ अभंग, धनंजय नाळे, मोरवडचे सरपंच रामहरी कुदळे आणि उपसरपंच कांतीलाल काळे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या भव्य सोहळ्यासाठी नागरिक, पालक आणि माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यालयाचे मुख्याध्यापक नवनाथ मोहोळकर व सर्व शिक्षक व कर्मचारीवर्गाने केले आहे.



## कुकडीचे पाणी सीनात सोडून बंधारे भरावेत-विनोद महानवर यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**सोलापूर । प्रतिनिधी**



सीनानदीवरील खडकी, तरडगाव आणि संगोबा बंधारे फेब्रुवारीमध्येच कोरडे पडले असून परिसरातील गावांमध्ये पाणीटंचाई जाणवू लागली आहे. यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले असून, उस आणि केळीच्या लागवडींवरही परिणाम होण्याची भीती आहे.करमाळा तालुक्यातील या तीनही बंधाऱ्यांमध्ये पाणी नसल्यामुळे शेतीसह मुक्या प्राण्यांवरही दुष्काळसदृश्य परिस्थितीचे संकट घोंगावत आहे. उन्हाची तीव्रता वाढत असल्याने शेतकरी वर्गामध्ये चिंता वाढली आहे.

ही परिस्थिती लक्षात घेता विनोद महानवर यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे कुकडी प्रकल्पाचे पाणी सीनानदीमध्ये सोडण्याची मागणी केली आहे. यामुळे बंधारे भरून शेतकऱ्यांच्या आणि मुक्या प्राण्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडवता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.शेतकऱ्यांची गरज लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## घोसरी फाटा ते खुटवंडा मार्गाची दुरवस्था; सुधीर मुडेवार यांची तातडीने दुरुस्तीची मागणी

**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील घोसरी फाटा ते खुटवंडा मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे नागरिक त्रस्त असून प्रशासन उदासीन असल्याचे चित्र आहे. हा मार्ग जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात येतो.



सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या या मार्गाचे डांबरीकरण पूर्णतः उखडले असून, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. गिट्टी अस्ताव्यस्त पडल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. खुटवंडा येथील ताडोबा राष्ट्रीय उद्यानाच्या प्रवेशद्वाराकडे जाणारा हा मुख्य मार्ग असल्याने पर्यटक, एसटी बस आणि इतर वाहने मोठ्या प्रमाणावर ये-जा करतात. मात्र, रस्त्याची दुरवस्था झाल्याने दुचाकी, चारचाकी आणि सायकलस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याच्या निकृष्ट अवस्थेमुळे वाहनांचे नुकसान होत असून, अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शालेय विद्यार्थी आणि सामान्य नागरिकही या समस्येमुळे हैराण झाले आहेत.रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा नागरिकांच्या वतीने आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सुधीर मुडेवार यांनी दिला आहे. प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्व.यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

**भद्रावती । प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा येथे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. राजेंद्र दास यांनी आपल्या मनोगतातून यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आलेख मांडत त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, उपाध्यक्ष तात्यासाहेब मस्कर, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, विश्वस्त चंद्रशेखर शिलवंत, माजी शिक्षण विस्तार अधिकारी अनिल बदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक तसेच कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीपूर्ण विचारधारेची ओळख करून देण्यात आली. महाविद्यालयात जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान, चर्चा सत्र आणि प्रेरणादायी विचारांचे आदान-प्रदान करण्यात आले.



## 'परोपकारी वृत्तीने वागल्यास परमेश्वर भरभरून देतो'-माजी आमदार जयवंतराव जगताप



**सोलापूर । प्रतिनिधी**

जीवनात सुख-दुःख हे अपरिहार्य असते. मात्र, भगवंताच्या नामस्मरणासह आनंदाने जगणे महत्त्वाचे आहे. परोपकारी वृत्तीने वागल्यास परमेश्वर भरभरून देतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे जनार्दन तर्कसे, असे प्रतिपादन माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी केले.श्री जनार्दन विठ्ठल तर्कसे यांच्या ९५व्या वाढदिवसानिमित्त जयवंतराव जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमानिमित्त कवी इंद्रजीत भालेराव यांचे 'मायबाप दैवत आपले' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक श्रीराम तर्कसे सर यांनी केले.या कार्यक्रमाला दिलीप दादा तळेकर, जयंत गिरी महाराज, पृथ्वीराज भैय्या पाटील, शैलेश दादा देशपांडे (मिरज), अजित तळेकर, सरपंच राहुल आबा कोरे, पंचायत समितीचे माजी सभापती शेखर गाडे, आनंद शिंदे, दिलीप दोंड, विलास बिचितकर, दयानंद तळेकर, श्रीहरी तळेकर, सागर राजे दौंड, सागर राजे तळेकर, दत्तात्रय बिचितकर, बाळासाहेब देवकर, विष्णू दादा पारखे, गोसेवक परमेश्वर तळेकर, महावीर आबा, अच्युत काका, संदीप तळेकर, गणेश आबा तळेकर, बाजार समितीचे सहसचिव रवींद्र उकिरडे आणि दिगंबर रासकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात विराज तळेकर यांनी कविता वाचन करून श्रोत्यांची मने जिंकली. सूत्रसंचालन शहाजी रंधवे सर आणि साईनाथ देवकर गुरुजी यांनी केले, तर आभार मंगेश तर्कसे सर यांनी मानले.

## मकरंद चिनके 'युवा समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित



**गंगाखेड । प्रतिनिधी**

येथील सामाजिक कार्यकर्ते मकरंद दगडू चिनके यांना 'युवा समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र कोष्टी समाजसेवा मंडळ, मुंबई यांच्या आयोजनात तसेच श्री देवांग समाज चौंडेश्वरी मंदिर, कोल्हापूर आणि श्री देवांग समाज रजिस्टर, इचलकरंजी यांच्या सहकार्याने कोल्हापूर येथे राज्यस्तरीय महिला व समाज बांधव मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मकरंद चिनके यांनी आई-वडिलांचा सामाजिक वसा पुढे नेत गीता मंडळ व लायन्स क्लबच्या माध्यमातून उल्लेखनीय सामाजिक कार्य केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना 'युवा समाज भूषण' पुरस्काराने गौरवण्यात आले.पुरस्कार वितरण सोहळ्यात निम्हणकर यांच्या हस्ते मकरंद चिनके यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी त्यांची पत्नी सौ. कोमल मुसळे/चिनके, सासरे सुनील मुसळे आदी उपस्थित होते.

# इयत्ता बारावीपर्यंत मराठी अनिवार्य; पुढील शैक्षणिक सत्रात अंमलबजावणीची मागणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने इयत्ता बारावीपर्यंत सर्व विद्याशाखांमध्ये मराठी विषय अनिवार्य करण्याचा आदेश जारी केला असून, त्याची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक सत्रापासून राज्यभर लागू करण्यात यावी, अशी मागणी मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

मराठी भाषा आता अभिजात भाषा म्हणून मान्यता प्राप्त झालेली आहे. राज्य शासनाने १३ सप्टेंबर २०२४ रोजी यासंबंधी आदेश काढला असून, मराठी भाषा धोरणाअंतर्गत इयत्ता बारावीपर्यंत मराठी विषय अनिवार्य करण्यात आला आहे. मात्र, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात व्हावी, यासाठी मराठी विषय शिक्षक महासंघ चंद्रपूरच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शिक्षण मंत्री उदय सामंत आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आले.या निवेदनाच्या वेळी मराठी भाषा धोरण आणि मराठी अनिवार्य करण्याच्या निर्णयावर जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मराठी विषय शिक्षक महासंघाने राज्यात मराठी विषयाची दुरवस्था होऊ नये यासाठी ठाम भूमिका घेतली असून, पुढील शैक्षणिक सत्रापासून तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने आवश्यक पावले उचलावीत, अशी भूमिका महासंघाने मांडली.या वेळी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना निवेदन देताना मराठी विषय शिक्षक महासंघाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. ज्ञानेश हटवार, सल्लागार डॉ. विजय हेलवटे, जिल्हाध्यक्ष प्रा. नामदेव मोरे, मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सुधीर मोते, जिल्हा संघटक प्रा. किशोर ढोक, तालुका अध्यक्ष प्रा. सरिता कंचेवार (चंद्रपूर), प्रा. महेश गेडाम (राजुरा), प्रा. जे. एम. राजुरकर, आर. आर. बारसागडे यांच्यासह मराठी विषय शिक्षक महासंघाचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# चंद्रपुर शिवसेनेच्यावतीने भद्रावतीत शिवजयंती साजरी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी रोजी झाला असला तरी महाराष्ट्रात शिवजयंती तिथीनुसार साजरी केली जात असल्यामुळे चंद्रपुर शिवसेनेच्यावतीने भद्रावती नगर परिषद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला माल्यार्पण व पूजाअर्चना करुन मिठाई वाटप करीत मोठ्या जल्लोषात शिवजयंती साजरी करण्यात आली.यावेळी शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख मिनल आत्राम, शिवसेना चंद्रपुर तालुका प्रमुख तथा कामगार जिल्हाध्यक्ष संतोष पारखी, कामगार जिल्हा उपाध्यक्ष बंटी हेमके, चंद्रपुर तालुका संघटक संजय शिंदे, चंद्रपुर उप तालुकाप्रमुख विक्की महाजन, चंद्रपुर उपशहर प्रमुख विश्वास खैरे, भद्रावती कामगार तालुकाप्रमुख योगेश म्यानेवार, शहर प्रमुख विकास मडावी, वाहतुक शहर प्रमुख बाळू पतरंगे, युवासेना उप शहर प्रमुख विवेक दुर्गे, महिला उप तालुकाप्रमुख राधा कोल्हे, माजी नगरसेवक नाना दुर्गे, ऑटो संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळु उपलंचीवार, भद्रनाग मंदिर कमेटी उपाध्यक्ष योगेश पांडे, प्रकाश मेंढे , विजु बोरकर, राजू रायपुरे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांसाठी मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

स्वर्गीय आप्पाजी जोशी स्मृती सेवा न्यास, हिंगणघाट व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लोककल्याण समिती, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारत विद्यालय, हिंगणघाट येथे मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.हे शिबिर भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान महाविद्यालयात १८ व १९ मार्च २०२५ या दोन दिवशी राबवले जात आहे. या उपक्रमाचा उद्देश शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणे व त्यांना रक्तातील हिमोग्लोबिनबाबत जागरूक करणे हा आहे.



कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जिल्हा वर्धा संघचालक जेठानंद राजपूत, विनय आंबूलकर (लोककल्याण समिती, नागपूर), विवेक भिस्मा, शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका कोंडावार व बुरिले उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन त्रिशूल लोंढेकर (वर्धा जिल्हा सहकार्यवाह) यांनी केले. यानंतर विनयजी आंबुलकर यांनी विद्यार्थ्यांना आहारातील पोषकतत्त्वे, रक्तातील हिमोग्लोबिनचे महत्त्व व त्याच्या कमतरतेमुळे होणारे परिणाम यावर सविस्तर मार्गदर्शन केले.मुख्याध्यापक हरीश भट्टड यांनी शिबिराच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या तर उपमुख्याध्यापक किशोर चवरे यांनी आभार प्रदर्शन केले. शिबिराचे आयोजन व तपासणीसाठी पवन बावनकुळे, पायल मलाधारी, प्रतीक्षा देशमुख, गौरी बिसेन, मिथिलेश शुक्ला व अमित भुरे यांनी सेवा दिली.या शिबिरात सुमारे १२०० ते १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून, पुढील दोन दिवस हे शिबिर सुरू राहणार आहे. शाळेच्या वतीने सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले व अशाच उपक्रमांना भविष्यातही पाठिंबा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# आर.के.ज्ञान मंदिरम,पुलगाव येथे होळी उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील आर.के. ज्ञान मंदिरम इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये होळीचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका प्रीती बिडकर, प्रणिता कोंबे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमानिमित्त विशेष परिपाठाचे आयोजन करण्यात आले होते. होलिका पूजन प्राचार्य नितीन श्रीवास, प्रीती बिडकर आणि प्रणिता कोंबे यांच्या हस्ते करण्यात आले. नववीच्या विद्यार्थिनी समृद्धी वैद्य हिने होळीच्या इतिहासावर माहिती दिली, तर श्रेया दुबे हिने हिरण्यकश्यप, प्रल्हाद आणि होलिकाची कथा सांगितली.दिपाली दिने यांनी 'बरसे रंग गुलाल श्याम तेरे होली मे' हे गाणे सादर करून वातावरण रंगतदार केले. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि पर्यावरणपूरक होळी साजरी करण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. प्राचार्य नितीन श्रीवास यांनी विद्यार्थ्यांना होळीचे महत्त्व सांगत नैसर्गिक रंगांचा वापर करून पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले.यानंतर सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी होळीच्या गाण्यांवर नृत्य सादर केले आणि गुलालाचा वापर करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली. संपूर्ण शाळेत सणासुदीचे आणि आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.



# शीला डोंगरे यांना हिंदी साहित्य सेवा पुरस्कार जाहीर

**पुलगाव । प्रतिनिधी**

सार्थक नव्या मासिकाच्या संस्थापक आणि अखिल हिंदी साहित्य सभेच्या राष्ट्रीय अध्यक्ष शीला डोंगरे यांची हिंदी साहित्य सेवा पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांना 'सुब्रमण्य भारती हिंदी सेतू विशिष्ट सेवा पुरस्कार'ाने सन्मानित करण्यात येणार आहे.हिंदी साहित्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. २०२४-२०२५ या वर्षासाठी राज्य हिंदी साहित्य अकादमीमार्फत हा पुरस्कार दिला जाणार असून, यामध्ये एक लाख रुपये रोख, प्रशस्तिपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला जाईल.



शीला डोंगरे यांच्या कथाकथन, कादंबरी आणि कवितांच्या अनेक पुस्तकांची आजवर प्रकाशने झाली असून, त्यांनी हिंदी साहित्याच्या प्रसारात महत्त्वाचे योगदान दिले आहे.पुरस्कार वितरण सोहळा मंगळवार, १८ मार्च रोजी सायंकाळी मुंबईतील रंगशारदा सभागृह, बांद्रा रिफलेक्शन येथे होणार आहे. या सोहळ्यात रोजगार व उद्योग मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या विशेष उपस्थितीत सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.यावेळी केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, खासदार वर्षा गायकवाड, आमदार उद्धव ठाकरे, आमदार अनिल परब, आमदार मिलिंद नार्वेकर, आमदार अमरजित मिश्रा, अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शीतला प्रसाद दुबे, मंजू लोढा, प्रियंका ठाकुर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.शीला डोंगरे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्यांना सोपान दातार, डॉ. मिलिंद ठोंबरे, पंकज तिवारी, संपादक अनुपकुमार भार्गव, खइ७ न्यूज नेटवर्कचे संपादक उत्तम वानखेडे, नेशनल व्हाईस मिडिया फोरमचे किरण उपाध्ये, विजय टेंभूर्णे, मानवाधिकार पत्रकार राजेंद्र डोंगरे, अभियंता सुबुद्ध डोंगरे, मनोहर पंचारिया, अधिवक्ता लांजेवार, डॉ. नेहा ठवळे (राममनोहर लोहिया हॉस्पिटल), नागेश चाटे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धाटाव एमआयडीसीतील अपघातांचे सत्र सुरूच एक्सेल कंपनीत सुपरवायझरचा संशयास्पद मृत्यू

**रायगड । प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीत कामगार अपघात आणि पिळवणुकीच्या घटनांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. याच पार्श्वभूमीवर एक्सेल कंपनीत एका सुपरवायझरचा संशयास्पद मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.

धाटाव औद्योगिक वसाहतीमध्ये याआधी साधना कंपनीत स्फोट, रोहा डाय कंपनीतील आग यांसारख्या दुर्घटनांमध्ये अनेक कामगारांना जीव गमवावा लागला आहे. अपघातांची ही सातत्याने सुरू असलेली मालिका कामगारांच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. यापूर्वीही एक्सेल कंपनीत अपघात झाले असून, आता सुपरवायझरचा संशयास्पद मृत्यू झाल्याने कंपनीतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.कंपनी प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मृत सुपरवायझर




प्रमोद घोसाळकर (कंत्राटदार सचिन लिंबोरे यांच्या अंतर्गत कार्यरत) यांनी रात्री लॉकरमधील कागदपत्रे घेण्यासाठी गेटवरून परवानगी घेऊन कंपनी आवारात प्रवेश केला होता. मात्र, तो बराच वेळ बाहेर न आल्याने शोधमोहीम राबवण्यात आली.पहाटेपर्यंत शोध सुरू राहिल्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेतला असता, पाण्यात मृतदेह सापडला. अद्याप मृत्यूचे कारण स्पष्ट झालेले नाही.या संशयास्पद मृत्यूवरून स्थानिक ग्रामस्थ आक्रमक झाले असून, कंपनी प्रशासनाने जबाबदारी स्वीकारावी, अन्यथा मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा इशारा दिला आहे. आता या मृत कामगाराच्या कुटुंबाला आर्थिक मदत कंपनी देणार की कंत्राटदार? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे.या घटनेमुळे एक्सेल कंपनीतील सुरक्षा यंत्रणा आणि व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला आहे. सतत अपघात घडत असतानाही कामगार सुरक्षा उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या जात नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. प्रशासनाने यावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

# आदर्श विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा जुन्या आठवणींना उजाळा



**पाटस । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील कानगाव येथील आदर्श विद्यालयाच्या सन २००३ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. १६ मार्च २०२५ रोजी शेरू ॲग्रो टुरिझम, यवत येथे तब्बल २२ वर्षांनंतर माजी विद्यार्थी एकत्र जमले आणि जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि सरस्वती देवीच्या प्रतिमापूजनाने तसेच दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्वांनी शाळेतील आठवणींना उजाळा देत शिक्षकीय मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी शाळेतील शिक्षक आदरणीय कुरुमकर सर, एस.एस. गवळी सर, खडके सर आणि टी.ए. गवळी सर यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेत घालवलेले दिवस, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि त्या आठवणींचे महत्त्व अधोरेखित केले. चहापान आणि अल्पोपहाराच्या आयोजनाने कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रमेश जगताप आणि संतोष भाऊ राजपुरे यांनी केले. तसेच रोहिणी चौधरी, विद्या गायकवाड, नीता फडके, माधुरी लोणकर, अशोक जगताप, दत्ता चौघुले, भाऊसाहेब कोन्हाळे पाटील, संतोष भाऊ राजपुरे, रमेश जगताप आणि भानुदास काळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी दरवर्षी पुन्हा भेटण्याचे आश्वासन देत सर्वांनी निरोप घेतला, आणि हा स्नेहमेळावा आनंददायी आणि संस्मरणीय क्षण बनला.

# समलैंगिक संबंध उघड होण्याच्या भीतीने १९ वर्षीय तरुणाचा निर्घृण खून: दोघांना अटक

**शिरूर । रमेश बनसोडे**

श्रीगोंदा तालुक्यातील दाणेवाडी येथे बुधवारी (दि. १२) सकाळी विहिरीत आढळलेल्या मृतदेहाच्या प्रकरणाचा उलगडा झाला असून, हा खून समलैंगिक संबंध उघडकीस येण्याच्या भीतीतून घडल्याचे समोर आले आहे. माऊली सतीश गव्हाणे (वय १९, रा. दाणेवाडी) या तरुणाचा खून सागर दादाभाऊ गव्हाणे (वय २०) व त्याच्या अल्पवयीन साथीदाराने केल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

आरोपींनी दीड महिन्यांपूर्वीच माऊलीच्या खुनाचा कट रचला होता. त्याला बोलावून घेऊन अत्यंत थंड डोक्याने त्याचा गळा आवळून खून करण्यात आला. पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेहाचे तुकडे करून दोन वेगवेगळ्या विहिरीत टाकण्यात आले. ६ मार्च रोजी माऊली बेपत्ता झाला होता, आणि १२ मार्च रोजी त्याचा मृतदेह विहिरीत आढळला. पोलिसांनी तांत्रिकतपास करत तिघांचे मोबाईल एकाच वेळी बंद झाल्याचे आढळून आणले. याच धाग्याने पोलिसांनी चार-पाच दिवसांतच आरोपींना शोधून काढले. ६ मार्चच्या रात्री आरोपींनी लुडो गेम खेळण्याचा बहाणा करत माऊलीला बोलावले. त्यानंतर दाणेवाडी येथील विठ्ठल मांडगे यांच्या विहिरीवर नेऊन त्याचा गळा आवळून खून केला. मृतदेहाचे तुकडे करून दोन वेगवेगळ्या विहिरीत टाकण्यात आले. या घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने सागर गव्हाणे व त्याच्या साथीदाराला अटक केली असून, सोमवारी न्यायालयाने सागर गव्हाणेला २४ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.




# ज्येष्ठ कीर्तन प्रवचनकार सुरेखाताई शिंदे राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित

**जुन्नर । प्रतिनिधी**

राज्यभर कीर्तन प्रवचन सेवेद्वारे हिंदू संस्कृतीचे संस्कार, स्त्री सक्षमीकरण,अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाज प्रबोधनाच्या माध्यमातून भागवत धर्माचा प्रचार करणाऱ्या प्रसिद्ध कीर्तन प्रवचनकार सुरेखाताई शिंदे यांचा नुकताच राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मान करण्यात आला.त्यांच्या आजवरच्या समाजकार्याची दखल घेऊन जुन्नरच्या शिवनेरी स्मारक समितीच्या वतीने किल्ले शिवनेरी गडावर फाल्गुन वद्य तृतीया म्हणजेच १७ मार्च या तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीदिनी राज्याचे कॅबिनेट मंत्री निलेश राणे यांच्या हस्ते हा सन्मानाचा पुरस्कार देण्यात आला.हभप सुरेखाताई या गेली पंधरा वर्ष कीर्तन प्रवचनाच्या माध्यमातून गावोगावी जाऊन समाज प्रबोधनाचे महान कार्य करीत आहेत.अखंड हरिनाम सप्ताह,दशक्रिया विधी,वर्षश्राध्द अशा विविध कार्यक्रमातून त्यांनी राज्यभर समाजपरिवर्तनासाठी खुप प्रयत्न केले आहेत..सह्याद्री वाहिनीवरील सखी या कार्यक्रमामुळे तर त्या घराघरात पोहचल्या आहेत.कीर्तन प्रवचनाचे त्यांचे कार्यक्रम जुन्नर आंबेगाव तथा पुणे जिल्ह्यापुरतेच मर्यादित न राहता आता राज्यभर होऊ लागले आहेत.आपल्या कीर्तनातून भारतीय संस्कृती आणि यातही प्रामुख्याने हिंदू संस्कृतीविषयी त्या प्रामुख्याने परखड भाष्य करीत असतात.भागवत धर्माचा प्रसार करताना त्यांनी नेहमीच आपल्या संतांची शिकवण, संस्कारिक वारसा जोपासण्याचे आवाहन समाजाला केले आहे. त्यांच्या याच अनन्यसाधारण कार्याची दखल घेत जुन्नरच्या शिवनेरी स्मारक समितीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती सोहळ्यात किल्ले शिवनेरीवर सन्मानाचा राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन यथायोग्य सन्मान केला. या सोहळ्यास आमदार शरद सोनवणे, डॉ.एकबोटे,शिव व्याख्याते सौरभ कर्डे,संतोष खैरे,शाहीर हेमंत मावळे, मधुकर काजळे,रमेश कर्पे आणि शिवप्रेमी जनता मोठ्या संखेने उपस्थित होती. दरम्यान सुरेखाताई ताई यांच्या या सन्मानाने राज्यभरातून त्यांचेअभिनंदन होत असून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.नाभिक समाजातील विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून देखील त्यांचे कौतुक होऊन त्यांना पुढील समाज कार्यास शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा



## तहसील कार्यालय परीसरात कागदी कपात चहाला बंदी

**ग्राहकाने कागदी कप आणि त्यापासून होणाऱ्या कर्करोगाचा प्रश्न उपस्थित केला. याविषयी ग्राहक पंचायत भद्रावती ने निवेदन देल्याचे सांगितले. यावर तहसीलदार राजेश भांडारकर यांनी तुरंत कारवाई करत तहसील कार्यालय परीसरात कागदी कपात चहाला बंदी घालण्याचे निर्देश दिले.**

**भद्रावती । प्रतिनिधी**

तहसील कार्यालय भद्रावती येथे तहसीलदार राजेश भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक ग्राहक हक्क दिन साजरा करण्यात आला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे सचिव, प्रवीण चिमुरकर तसेच अध्यक्ष, बालाजी दांडेकर, माजी अध्यक्ष, वामन नामपल्लीवार, प्रा. विवेक सरपटवार यांची उपस्थिती होती. तहसीलदार राजेश भांडारकरांनी वस्तू विकत घेतांना ग्राहकांनी जागृक राहण्याची गरज आहे. वस्तू वरिल अंतिम तारीख, समाविष्ट सामग्री पाहून वस्तू विकत घ्यावी असे संबोधित केले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सचिव, प्रवीण चिमुरकर यांनी एम.आर.पी. विषयी माहिती देत एम.आर.पी. ही फसवी असून ही ग्राहकाला लुटणारी आहे. याविरोधात ग्राहक आंदोलनाची गरज असून ग्राहकांनी यासाठी एम.आर.पी. रद्द करण्याची मागणी शासनाला करावी असे वक्तव्य केले. प्रा. विवेक सरपटवार यांनी ग्राहकांनी वस्तू किंवा सेवा विकत घेतली आणि त्यामध्ये समस्या आढळून आल्यास त्याची तक्रार करू शकतो हे उदाहरणे देऊन स्पष्ट केले. तर वामन नामपल्लीवार आणि बालाजी दांडेकर यांनी ग्राहक चळवळी विषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे संचालन नायब तहसीलदार, आकनुरवार यांनी केले. यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे सदस्य, पदाधिकारी तसेच रेशन दुकानदार आणि मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते.

# गंगापूर तहसील कार्यालयाचा अजब कारभार ओळखपत्र नसल्याने नागरिकांची गैरसोय



**वैजापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तहसील कार्यालयात शासकीय कर्मचाऱ्यांना ओळखपत्र लावण्याच्या आदेशाकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. कार्यालयात आलेल्या नागरिकांना योग्य अधिकाऱ्यांची माहिती मिळत नसल्याने ते एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर फिरत आहेत.

शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना ओळखपत्र सक्तीचे करण्याचा आदेश दिला असून, त्याचबरोबर टेबलावर नावाची पाटी लावणे बंधनकारक केले आहे. महसूल, अन्न आणि नागरी पुरवठा, पंचायत समिती, ग्रामपंचायत आदी कार्यालयांत नागरिक विविध योजनांच्या माहितीसाठी येतात, मात्र कोणाकडे जावे, हे त्यांना समजत नाही.प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रशासनाकडून ओळखपत्र देण्यात आले आहे. मात्र, हे ओळखपत्र कार्यालयात न वापरता, फक्त वाहतूक पोलिसांनी अडवल्यास किंवा इतर शासकीय कामांसाठीच दाखवले जात असल्याचे चित्र दिसत आहे.गंगापूर तहसीलदार नवनाथ वागवड यांनी सांगितले की,

सर्व कर्मचाऱ्यांना कार्यालयात आल्यानंतर दर्शनी भागावर ओळखपत्र लावण्याचे आदेश दिले आहेत. शिस्तभंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.गंगापूर तहसील कार्यालयाचे इमारत रूपाने सुधारण झाले असले, तरी येथील कर्मचाऱ्यांची शिस्त सुधारण्यासाठी प्रशासन ठोस पावले उचलणार का? असा सवाल आता नागरिक करत आहेत.

# पिशोर–सिल्लोड रस्त्यावर भीषण अपघात; लिपिकाचा जागीच मृत्यू

**पिशोर । प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यातीलपिशोर–सिल्लोड मार्गावर वीज वितरण कंपनीच्या १३२ केव्ही वीज केंद्राजवळ दुचाकी आणि पिकअप वाहनाचा



अपघातहोऊनलिपिक पदावर कार्यरत अमोल सुखदेव देहाडे (वय ३८, रा. शेलगाव, ह. मु. कन्नड) यांचा जागीच मृत्यूझाला.

सोमवारी (दि. १७) संध्याकाळीअमोल देहाडे हे मोटरसायकल (क्रमांक चक२० न ९२३०) वरून कन्नडकडे जात असतानासमोरून भरधाव वेगाने आलेल्यामहिंद्रा पिकअप (क्रमांक MH 20 GC 2058) ने जोराची धडक दिली.अपघातातडोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या अमोल देहाडे यांच्यामागे पत्नी, मुलगा, मुलगी आणि सावत्र आई असा परिवार आहे.या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण कुटुंबावर शोककळा पसरली आहे. सदरील घटनेचीपिशोर पोलीस ठाण्यात नोंद घेण्यात आली असून, पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# हिरकणी महिला प्रभाग संघ शिऊरची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**वैजापूर । प्रतिनिधी**

हिरकणी महिला प्रभाग संघ शिऊरची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. महिला बचत गटांना स्वयंरोजगार आणि उद्योगासाठी प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साधना अरुण त्रिभुवन होत्या. कोषाध्यक्ष राणी प्रकाश वाघचौरे आणि सचिव मंदा समाधान पळसकर उपस्थित होत्या.



यावेळी जिल्हा व्यवस्थापक बिभीषण भुईटे, आर्थिक समावेशक व्यवस्थापक सुचिता खोतकर, बँक ऑफ इंडियाचे एस. बी. वैद्य, बँक ऑफ महाराष्ट्राचे जिनेंद्र डोईजन, माजी उद्योग संचालक जे. के. जाधव, तालुका अभियान व्यवस्थापक सचित गिलके, संदीप सावंत, वाल्मीक गायकवाड, गणेश सूर्यवंशी, बाळू चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.शिऊर पंचक्रोशीतील सर्व ग्राम संघ, उमेद अभियानाचे बचत गट आणि हिरकणी महिला प्रभाग संघातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. कोणत्याही अडचणी असल्यास संघटनेच्या प्रतिनिधींशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# लोकनेते टॅलेंट सर्च परीक्षा २२ मार्चला; तीन परीक्षा केंद्रांवर आयोजन

**मोहोळ । प्रतिनिधी**

लोकनेते बाबुराव (अण्णा) पाटील अनगरकर यांच्या स्मरणार्थ



आयोजित 'लोकनेते टॅलेंट सर्च परीक्षा २०२४–२५' शनिवार, २२ मार्च रोजी दुपारी १२:३० वाजता होणार असल्याची माहिती परीक्षा प्रमुख प्राचार्य गणेश उघडे यांनी दिली.

ही परीक्षा जिल्हा परिषद शाळा शिरपूर (सो.), डी. व्ही. गायकवाड प्रशाला मोहोळ आणि स्टोन ब्रिज पब्लिक स्कूल अनगर या केंद्रांवर घेतली जाणार आहे.परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षमतेचा विकास होईल आणि गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल, असे आयोजकांकडून सांगण्यात आले. अधिक माहितीसाठी संबंधित परीक्षा केंद्रांशी संपर्क साधावा.

# मुंबई जिल्हा टेनिस स्पर्धेत शहापूरच्या दोन बहिणींचे यशस्वी प्रदर्शन



**शहापूर । प्रतिनिधी**

मुंबई जिल्हा टेनिस स्पर्धेत शहापूर तालुक्यातील शुभदा घोडविंदे आणि तेजस्विनी घोडविंदे या दोन बहिणींनी आपली चमकदार कामगिरी सिद्ध करत विजेतेपद आणि उपविजेतेपद पटकावले आहे.ग्रामीण भागातील खेळाडूंना टेनिससारख्या स्पर्धात्मक खेळात संधी मिळावी यासाठी त्यांचे वडील दीपक (नाना) घोडविंदे यांनी स्वतःच्या मोगरा पिकावर लाखोंचा खर्च करून घरासमोर टेनिस कोर्ट तयार केले. या मेहनतीचे चीज करत दोन्ही बहिणींनी सातत्याने सराव करून आपली ओळख निर्माण केली.

मुंबई विभागातून खेळताना Under–१२ गटात त्यांनी उत्कृष्ट खेळ करत प्रतिस्पर्धींना मात दिली. अंतिम फेरीत त्या दोघीच एकमेकांसमोर आल्या आणि विजेतेपद तसेच उपविजेतेपद शहापूरच्या नावावर मोहर लावली.परिस्थितीच्या अडचणींवर मात करून या बहिणी जिद्दीने खेळत असून, महिला टेनिसमध्ये राज्य आणि देशासाठी नवे भविष्य घडवत आहेत. त्यांचे क्रीडा क्षेत्रातील यश शहापूर तालुक्यात कौतुकाचा विषय ठरत आहे.

# टरबूज घेऊन जाणारा ट्रक झाला पलटी सुदैवाने ट्रक ड्रायव्हर वाचला

## कोणतीही जीवित हानी नाही



**देवळी । प्रतिनिधी**

बुटीबोरी तुळजापूर महामार्ग क्रमांक महामार्ग क्रमांक ३६१ वरील देवळी यशोदा नदी समोरील पेट्रोल पंप जवळ टरबूज घेऊन जाणारा ट्रक पलटी झाला या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. सदर ट्रक विदर्भ रोडलाईन्सचा होता .

परभणी यवतमाळ मार्ग कोलकाता ला टरबूज घेऊन जाणारा ट्रक महामार्गावरून जात असताना अचानक दुचाकी स्वार समोर आल्याने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात मंगळवार दि. १८/ ३/२०२५ ला दुपारच्या दरम्यान ट्रक क्रमांक चक१२ ड्ढ४६३९ डिव्हायडर वर चढून विरुद्ध दिशेच्या बाजूला जाऊन पलटी झाला त्याच वेळी रस्त्याने जाणारे येणारे कोणतेही वाहन मधात नसल्याने मोठा अनर्थ टळला ट्रक चालक सय्यद मौला हा सुखरूप असून ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे सदर ट्रक मध्ये २८ टन टरबूज भरलेले होते ट्रक पलटी झाल्याने सर्व टरबूज रस्त्यालगत असलेल्या शेतात अस्ताव्यस्त पडले होते अपघात पाहण्यासाठी घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाली होती देवळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघाताची नोंद घेऊन रस्ता रहदारीस मोकळा केला देवळी पोलीसचे ए एस आय साखरे, शिपाई सलीम शेख, होमगार्ड सैनिक विलास सुरसे, सचिन वैद्य, संकेत मडावी, शंकर नांदणे, रवींद्र माणिकपुरे, मोहन नेहारे ,प्रकाश ढोले इत्यादी कर्मचाऱ्यांनी तत्परतेने रस्ता मोकळा करून वाहतूक सुरळीत केली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .